सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११ वे, राजपत्र क्र. ४२] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर १६-२२, २०२५ : आश्विन २४-३०, शके १९४७ [पृष्ठे - ४५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक–छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | २४०३ ते २४१७ | भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | ८८९ ते ८९१ |
| संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले. | २४१८ ते २४४४ | | |


# शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

१

अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून
नगर विकास विभाग,
चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-०४/०९/२०२५.

**अधिसूचना**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६. :-*

**क्र. टिपीएस - ३०२४/२३१/प्र.क्र.५२/२०२४/वि.यो.मंजूरी (भागशः)/ नवि -३० :-** ज्याअर्थी कन्नड नगरपरिषद, जि. छत्रपती संभाजीनगर (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असा उल्लेख करणेत आलेला आहे.) या नियोजन प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख करणेत आलेला आहे.) चे कलम २३ *(१) सह कलम३८ (१)* अन्वयेच्या तरतुदीनुसार ठराव क्र. ०२, दि. ०२/०२/२०२१ अन्वये, प्रारुप विकास योजना [मुळ हद्दमंजूर ति.सु.) + वा.ह.(सु.)], (यापुढे "उक्त प्रारुप विकास योजना" असे संबोधिलेले आहे) तयार करणेचा इरादा जाहीर केला असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी, पृष्ठ क्र.१८ वर, दि. १८ ते २४ फेब्रवारी २०२१ अन्वये प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये तिच्या हद्दीतील जमिनीचे सर्वेक्षण करुन, उक्त प्रारुप विकास योजना तयार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २६ *(१)* अन्वये प्रसिध्द करण्यास ठराव क्र. १९, दि. ०९/११/२०२२ अन्वये मान्यता दिली असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी, दि.१७ ते २३ नोव्हेंबर, २०२२ रोजी, सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रसिध्द प्रारुप विकास योजनेवर विहित मुदतीत आलेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८ *(२)* नुसार स्थापन केलेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने नियोजन समितीचा अहवाल विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम *२८(४)* अन्वये उक्त प्रारुप विकास योजनेत काही बदल करुन, ठराव क्र.३७, दि. १४/०३/२०२३ अन्वयेच्या ठरावानुसार असे बदल प्रसिध्द करण्याचे ठरवून, या बदलांसह (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधिलेले आहे) प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम *२८ (४)* अन्वये जनतेच्या अवलोकनार्थ प्रसिध्द केली असून, त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणीमध्ये, दि. २३ ते २९ मार्च २०२३ रोजी प्रसिध्द झाली आहे;

# संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**३**

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड यांजकडून**

**प्रारंभिक अधिसूचना कलम ११**

**दि.१३/१०/२०२५**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

**क्र.२०२५/उजिअ/लसिका/सिआर-०८.–** ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३० ) याच्या कलम ३ च्या खंडा (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसूल व वनविभाग क्रमांक संकिर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक १९-०१-२०१५ (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त अधिसुचना** असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमिसंपान करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास या सोबत जोडलेल्या अनुसूचित एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त जमीन** असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त सार्वजनिक प्रयोजन** असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसुचि दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसूचि तीन मध्ये दिलेली आहेत. आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूचि चार मध्ये दिलेला आहे,

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूचि पाच मध्ये दिलेला आहे.

त्या अर्थी आता, असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खाली कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू, उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सुट देता येईल.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूसंपादन, पुनर्वसन व पूनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त नियम** असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड** जिल्हा नांदेड यास पदनिर्देशित केले आहे.

**अनुसूची एक**

**संपादीत करावयाच्या जमीनीचे वर्णन**

**गाव : धावरी बु. ता.भोकर जि.नांदेड जि.नांदेड**

| अ.क्र. | भुमापन किंवा गट क्रमांक | प्लॉट क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | १ | १८७ | ९८.०० |
| २ | १ | ३१० | ११२.०० |
| ३ | १ | २९६ | १६५.०० |
| ४ | १ | ३०१ | ४२.०० |
| ५ | १ | २९७ | ९०.०० |
| | | एकुण | ५०७.०० |

**अनुसूची दोन**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपा बाबत विवरण

**प्रकल्पाचे नांव :** अतिरीक्त भुसंपादन प्रस्ताव धावरी-थेरबन-किनी-पाळज रस्ता प्र.जि.मा.-२० वरील सा.क्र ४१/०० वर रेल्वे ओलांडनी पुलाचे बांधकाम (एल.सि.क्र.४) मौ.धावरी बु. ता.भोकर जि.नांदेड

**प्रकल्प कार्यालचे वर्णन : कार्यकारी अभियंता सार्वजिनक बांधकाम विभाग भोकर जि.नांदेड**

**अनुसूची तीन**

बाधीत व्यक्तीचे विस्थापन होत नाही.

**अनुसूची चार**

(सामाजिक प्रभाव निर्धारण आभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला)

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश लागु नाही.

**अनुसूची पाच**

(नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील)

भूधारकाचे विस्थापन होत नसल्यामुळे प्रशासक नियूक्ती लागु नाही.

टिपः- उक्त जमीनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांकः- १३/१०/२०२५

ठिकाणः- नांदेड

(प्रियांका पवार)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
लसिका नांदेड.